याचिकाकर्ते सर्वश्री.गणपतराव छोटूजी गभने व इतर १३ विरुध्द महाराष्ट्र शासन (रिट याचिका क्रमांक १८६८/२००५) प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक १४.६.२०१७ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५(२०१७)/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २९ मार्च, २०१९.

वाचा: - १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओएस-१०७७/एस/सेल-१-स्वासै, मंत्रालय, मुंबई दि. २६/९/१९७७.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०८२/क १/स्वा.सै,दि.१६/२/१९८२
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०८२/क १/स्वा.सै,दि.६/९/१९८२
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओएस १०९४/प्र.क्र.३०१/स्वासैक१, दि. २४/१०/१९९४
५) शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय क्र. संकीर्ण २००४/प्र.क्र.१६१/०४/स्वासैक१, दिनांक १६/११/२००४
६) मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांचा न्यायनिर्णय दिनांक १४/६/२०१७.
७) मा. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचा न्यायनिर्णय दि. २५.०१.२०१८.
८) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५(२०१७)/स्वासैक-१, दिनांक- ०६ मार्च, २०१८.
९) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-१११८/प्र.क्र.५४/२०१८/स्वासैक-२, दिनांक ३०/८/२०१८
१०) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-१११८/प्र.क्र.७४/२०१८/स्वासैक-२, दिनांक १७/१२/२०१८
११) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-१११८/४१/प्र.क्र.८९/२०१८/स्वासैक-२, दिनांक १७/१२/२०१८
१२) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-१११८/४७/प्र.क्र.९६/२०१८/स्वासैक-२, दिनांक २२/०१/२०१९
१३) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-१११८/५१/प्र.क्र.१०७/२०१८/स्वासैक-२, दिनांक २२/०१/२०१९
१४) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५ (२०१७)/स्वासैक-१, दि.१३/०३/२०१९
१५) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५ (२०१७)/स्वासैक-१, दि.२०/०३/२०१९
१६) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५ (२०१७)/स्वासैक-१, दि.२६/०३/२०१९
१७) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००५/प्र.क्र.१४१/२००५ (२०१७)/स्वासैक-१, दि.२९/०३/२०१९

प्रस्तावना :-

केंद्र शासनाची गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतन पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर झाल्याने, ज्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाची गोवा मुक्ती स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतन मंजूर झाली आहे, त्यांना त्या दिनांकापासून राज्य शासनाची पुर्ण पेन्शन देण्याऐवजी दरमहा रु. ५००/- प्रमाणे अतिरिक्त सन्मान निवृत्तीवेतन देण्यात यावे असे संदर्भीय क्र. ०५ अन्वये निर्णय घेण्यात आला होता.

२. दिनांक १६.११.२००४ च्या शासन आदेशाच्या विरोधात सर्वश्री गणपतराव छोटूजी गभने व इतर १३ यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.१८६८/२००५ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या संदर्भाधिन दिनांक १४.६.२०१७ च्या न्यायनिर्णयाची

अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने संदर्भाधिन अनुक्रमांक ८ ते १६ येथे नमुद केलेल्या शासन निर्णयान्वये आता पर्यंत रु. ४४५,०१,४४,३४६/- इतकी रक्कम अदा केलेली आहे.

३. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचा दिनांक १४/०६/२०१७ चा न्याय निर्णयाची पूर्णत्वाने अंमलबजावणी करण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका क्र. ५३१/२०१८ दाखल करण्यात आली आहे. यास्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचा दिनांक १४/०६/२०१७ चा न्याय निर्णय हा सर्वच समान प्रकरणी लागू आहे. सदर अवमान याचिकेची पूर्णत्वाने अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी अतिरिक्त निधीची मागणी केलेली असल्याने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय-

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचा दिनांक १४/०६/२०१७ चा न्याय निर्णयाची पूर्णत्वाने अंमलबजावणी करण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका क्र. ५३१/२०१८ दाखल करण्यात आली आहे. यास्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचा दिनांक १४/०६/२०१७ चा न्याय निर्णय हा सर्वच समान प्रकरणी लागू आहे. सदर अवमान याचिकेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने संदर्भीय क्र १४ ते १६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी कार्यालयांना निधी वाटप केलेला आहे.

२) तथापि, सदर अवमान याचिकेची पूर्णत्वाने अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी रु. १,३६,००,०००/- एवढ्या अतिरिक्त निधीची मागणी केलेली असल्याने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना रु. १,३६,००,०००/- (रु. एक कोटी छत्तीस लाख फक्त.) एवढी रक्कम अदा करण्यात यावी. वितरणाची कार्यवाही संदर्भाधीन क्र. १७ च्या शासन निर्णयान्वये करावी.

३) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना वितरीत करण्यात आलेली थकबाकीची संपूर्ण रक्कम जिल्हाधिकारी यांनी कोषागारातून आहरीत करण्यात यावी व सदर थकबाकीची रक्कम तात्काळ संबंधीत केंद्र शासन स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन धारकांना अदा करण्यात यावी. सदर प्रयोजनासाठी जिल्हाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे. देयक MTR ३८ या नमुन्यामध्ये आहरीत करण्यात यावे व त्यासोबत लाभार्थ्यांची यादी "Pass For Payment" करण्यात यावी. **जिल्हाधिकारी यांनी उक्त थकबाकी रक्कमेचे वितरण NEFT/RTGS मार्फतच करावे.**

४) याप्रित्यर्थचा खर्च "मागणी क्र.ए-५, प्रधान लेखाशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण (६०) इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम (१०२) सामाजिक सुरक्षा योजना(००) (०१) स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इ. ना मानधन दत्तमत (२२३५ ००१५) या अर्थसंकल्पिय

लेखाशीर्षाखाली चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५) वरील आदेशानुसार तात्काळ कार्यवाही जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी या वित्तीय वर्षात पूर्ण करुन शासनास अहवाल सादर करावा. मा. उच्च न्यायालयाचा विषय असल्यामुळे या विषयी स्वत: लक्ष घालून काटेकोरपणे कार्यवाही करावी.

६) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. पूरक२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३,दि.८/०३/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२९१७०३२४७४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Hemant G Mhapankar
Date: 2019.03.29 17:06:57 +05'30'

(हे. गो.म्हापणकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
५) मा.राज्यमंत्री, सा.प्र.वि. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (२ प्रती)
७) जिल्हाधिकारी रत्नागिरी
८) जिल्हा कोषागार अधिकारी रत्नागिरी
९) निवडनस्ती (कार्या-स्वासैक-१).